# शासन निर्णय

मोठ्या, मध्यम व लघु प्रकल्पाच्या उर्ध्व बाजूस जलाशयाने बाधीत होणा-या जमीन व घरे संपादीत करणेबाबतचे सुधारीत निकष.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
**शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण-२०२०/प्र.क्र.३२३/मोप्र-२**
मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक: १७ फेब्रुवारी, २०२१

<u>संदर्भ:</u>-१) इंग्रजी शासन परिपत्रक क्र. ३. १९६५-एम-आय (इरिगेशन) दि. १० मे १९६५.
२) इंग्रजी शासन परिपत्रक एम.आय.पी. २२७४/१९७००-आय.पी-३ दि. १७ जानेवारी १९७५.
३) शासन परिपत्रक्र क्र. पूरनि/(१८२/२०१८)/सिंव्य महसूल दि. ३ मे, २०१८.

**प्रस्तावना:-**

१. लघुपाटबंधारे प्रकल्पाच्या जलाशयाने बाधित होणाऱ्या जमिनी तसेच बांधकामे यांच्या संपादनाबाबतच्या मार्गदर्शक सूचना संदर्भ क्र.१ अन्वये निर्गमित करण्यात आल्या होत्या. त्या संदर्भ क्र.२ च्या परिपत्रकान्वये अधिक्रमित करुन मोठ्या, मध्यम तसेच लघु प्रकल्पाच्या द्वारविरहीत आणि द्वारसहित जलाशयांसाठी एकत्रितरित्या निर्गमित करण्यात आल्या आहेत. या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रकल्प स्थळीची पुराची वारंवारीता विचारात घेऊन संपादित करावयाच्या जमिनी आणि बांधकामे निश्चित करण्याबाबत सूचित करण्यात आले आहे. या सूचनांनुसार इंग्लीस पूर (Inglis Flood) अथवा १०० वर्षाच्या वारंवारीतेच्या पुरामुळे बाधित होणारी बांधकामे संपादित करण्यात यावी असे परिपत्रकात नमूद आहे.

२. संदर्भ क्र.३ अन्वये नदीकाठचे निषिद्ध क्षेत्र व नियंत्रित क्षेत्र निश्चित करण्यासाठी पूररेषेच्या आखणीबाबत मार्गदर्शक सूचना प्रस्तृत करण्यात आल्या आहेत. या मार्गदर्शक सूचनांनुसार २५ वर्षे वारंवारितेच्या पुरामुळे बाधित होणारे क्षेत्र निषिध्द क्षेत्र घोषित करण्याची तरतूद आहे. अशा निषिध्द क्षेत्रामध्ये कोणतेही बांधकाम करणे प्रतिबंधित असते.

३. या तत्वाच्या आधारे धरणाच्या उर्ध्व बाजूस देखील २५ वर्षाच्या वारंवारीतेच्या पूरामध्ये बाधित होणाऱ्या बांधकामाचे संपादन आवश्यक व उचित ठरेल. तथापि, १९७५ च्या परिपत्रकानुसार त्यापेक्षा खूपच मोठ्या वारंवारीतेचा (१०० वर्षे) पुरामुळे बाधित होणारी बांधकामे संपादन केली जात आहेत. त्यामुळे अशी बांधकामे संपादन करण्यासाठी नाहक भुर्दंड शासनावर पडत आहे. सदरची विसंगती दूर करण्यासाठी १९७५ च्या परिपत्रकातील मार्गदर्शक सूचनांमध्ये बांधकाम संपादन करण्यासाठी विचारात घ्यावयाच्या पुराची वारंवारीता "इंग्लीस पूर" ऐवजी "२५ वर्षे वारंवारीतेचा पूर" अशी सुधारित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

मोठ्या,मध्यम,लघु प्रकल्पाच्या उर्ध्व बाजूस जलाशयाने बाधित होणाऱ्या जमिनी व घरे संपादीत करणेसाठी इंग्रजी शासन परिपत्रक एम.आय.पी. २२७४/१९७००-आय.पी-३ दि. १७ जानेवारी १९७५ अधिक्रमित करुन पुढीलप्रमाणे निकष निश्चित करण्यात येत आहेत.

१) जमिनी:-

**अ)** व्दारविरहीत जलाशयांसाठी: धरणाची पुर्ण संचय पातळी + १/२ पूर उचल पर्यंतच्या सर्व जमिनी संपादीत कराव्यात.

**आ)** व्दारयुक्त जलाशयांसाठी : धरणाची पुर्ण संचय पातळी + १/२ मी. ( ०.५ मी ) उभे किंवा २० मी. आडवे अंतर यापैकी जे कमी असेल तिथपर्यंतच्या सर्व जमिनी संपादीत कराव्यात.

२) घरे:-

**अ)** व्दारविरहीत जलाशयांसाठी : २५ वर्षे वारंवारीतेच्या पूराची महत्तम जल पातळी + १/२ मी. उभे किंवा २० मी . आडवे अंतर यापैकी जे कमी असेल तिथपर्यंतची सर्व घरे संपादीत करावीत.

**आ)** व्दारयुक्त जलाशयांसाठी: २५ वर्षे वारंवारीतेच्या पूराची (पाश्चजलाचा परिणाम विचारात घेऊन) महत्तम जल पातळी + १ मी. उभे किंवा ७५ मी. आडवे अंतर यापैकी जे कमी असेल तिथेपर्यंतची सर्व घरे संपादीत करावीत. असे करीत असताना,धरणाच्या उर्ध्वबाजूस पाश्चजलामुळे येणा-या महत्तम पातळ्या पुढील दोन परिस्थितीसाठी परिगणित कराव्यात:-

(१) धरण अस्तित्वात नसताना २५ वर्षे वारंवारितेच्या पुरासाठी येणा-या पातळ्या.

(२) धरण पूर्ण संचय पातळीस भरलेले असताना २५ वर्षाच्या वारंवारीतेच्या पुरासाठी येणा-या पाश्चजल पातळ्या.

वरील (१)व(२) येथील पातळ्यांमधील फरक ज्या ठिकाणी १० सेंटीमीटर पेक्षा कमी असेल असे धरणापासून सर्वात जवळचे ठिकाण धरणामुळे निर्माण होणारा पाश्चजलाचा परिणाम संपुष्टात आल्याचे ठिकाण ठरेल. धरणापासून अशा ठिकाणापर्यंतची लांबी १० ते १५ समान भागांमध्ये विभागून अशा प्रत्येक भागामध्ये परिस्थिती (२) साठी आढळलेल्या महत्तम पाश्चजल पातळीसाठी त्या भागातील घरांचे संपादन करावे.

ज्या प्रकरणी अधिक्रमित परिपत्रकानुसार भूसंपादनाचे निवाडे अद्याप झालेले नाहीत अशा प्रकरणी या निर्णयातील निकषानुसार संपादनाची आवश्यकता पडताळून पुढील कार्यवाही करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२१०२१७१६३५५२६७२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Atul Ashok Kapole

Digitally signed by Atul Ashok Kapole
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=797fcfe0bb4a86dd814129f50d05c1d249ea6f0acc364c6214f11ff7174bd5ef, serialNumber=ae2c4f4c985d3e984de94324901263d48766ec651dea49d652faf11a96aa98b5, cn=Atul Ashok Kapole
Date: 2021.02.17 16:41:14 +05'30'

( अतुल कपोले )

मुख्य अभियंता (द.व प्र.) व सह सचिव